# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे-०४.

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) नोव्हेंबर-डिसेंबर २०२० पुरवणी परीक्षा वेळापत्रकाबाबत.

### प्रकटन

---

फेब्रुवारी-मार्च २०२० च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्चा माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊ न शकलेल्या तसेच ए.टी.के.टी.साठी पात्र विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा नोव्हेंबर-डिसेंबर २०२० मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्चा माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा घेण्यात येत आहे. त्यानुसार लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| ०१ | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) | शुक्रवार दि.२०/११/२०२० ते<br>शनिवार दि. ०५/१२/२०२० |
| ०२ | उच्च्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)-<br>सर्वसाधारण व द्विलक्षी विषय | शुक्रवार दि.२०/११/२०२० ते<br>गुरुवार दि. १०/१२/२०२० |
| ०३ | उच्च्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)-<br>व्यवसाय अभ्यासक्रम | शुक्रवार दि.२०/११/२०२० ते<br>सोमवारदि. ०७/१२/२०२० |

इ.१०वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा बुधवार दिनांक १८/११/२०२० ते शनिवार दिनांक ०५/१२/२०२० व इ.१२वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा बुधवार दिनांक १८/११/२०२० ते गुरुवार दिनांक १०/१२/२०२० या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेल्या परीक्षांचे दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.in संकेतस्थळावर दिनांक २०/१०/२०२० पासून उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे विभागीय मंडळामार्फत छापील स्वरुपात दिलेलेच वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरुनच परीक्षेच्या तारखांची खात्री करुन घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने किंवा खाजगी यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राहय धरु नये, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक: २०/१०/२०२०

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४